**मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेकरीता कोळसा /लिग्नाइट आधारित ताप विद्युत प्रकल्पांमधून (Thermal Power Plants – TPPs) निघणाऱ्या माती आणि मलब्याचे (Overburden) व राखेचा (फ्लाय ॲश आणि बॉटम ॲश) वापर करण्यास मान्यता देण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**

R&FD-86032/7/2026-FAR - REV-REVENUE (E-1763494)
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
तारीख: २८ जुलै, २०२६

**वाचा :-**

१. केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली दिनांक ३१ डिसेंबर २०२१ अधिसूचना
२. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. १४.१२.२०२५

**प्रस्तावना :-**

ग्रामीण भागात शेत/पाणंद रस्त्यांची असलेली आवश्यकता, त्यांचे महत्व व सद्यःस्थितीत शेत/पाणंद रस्त्याच्या कामांकरिता मनरेगा अंतर्गत येणा-या अडचणी विचारात घेता पूर्णपणे यंत्रसामुग्रीचा वापर करुन शेत/पाणंद रस्ते तयार करण्यासाठी महसूल विभागामार्फत "मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" ही स्वतंत्र योजना राबविण्यास मंत्रिमंडळाने दि.०७.१२.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. याअनुषंगाने दिनांक १४.१२.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अधिक सुसूत्रता आणण्यासाठी दिनांक १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये दिनांक दि. ०७.०१.२०२६ , दि.१८.०२.२०२६, दि.२५.०३.२०२६ व दि.१५.०४.२०२६ रोजी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

राज्य शासनामार्फत ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आणि

शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' राबविण्यात येत आहे. या रस्त्यांच्या भरावासाठी व मजबुतीकरणासाठी मोठ्या प्रमाणात माती व मुरूम यांसारख्या गौण खनिजांची आवश्यकता भासते.

केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक ३१ डिसेंबर २०२१ च्या अधिसूचनेनुसार, कोळसा किंवा लिग्नाइट आधारित ताप विद्युत प्रकल्पांमधून (Thermal Power Plants - TPPs) निघणाऱ्या राखेचा (फ्लाय ॲश आणि बॉटम ॲश) १००% वापर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. सुपीक मातीचे संवर्धन करणे आणि पर्यावरणाचे रक्षण करणे हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. या नियमानुसार, वीज प्रकल्पांच्या ३०० किलोमीटरच्या परिघात असणारे सर्व शासकीय, निमशासकीय व खाजगी रस्ते, उड्डाणपूल, धरणे आणि बांधकाम प्रकल्प यांना राखेचा वापर करणे बंधनकारक आहे. या पायाभूत सुविधांच्या कामांसाठी औष्णिक प्रकल्पांनी राखेचा पुरवठा व वाहतुकीचा खर्च प्रकल्पाने स्वतः सोसणे किंवा परस्पर संमतीने ठरवणे गरजेचे आहे.

मा. लोकप्रतिनिधींनी कोळसा खाणींमधून उत्खनन करताना निघणारी माती आणि मलब्याचे (ओव्हरबर्डन) व औष्णिक प्रकल्पांतील राखेचा वापर शेत रस्त्यांसाठी विनामूल्य व शून्य रॉयल्टी तत्त्वावर करण्याची विनंती केली आहे. या बाबींचा सविस्तर विचार करून, ग्रामीण रस्त्यांची कामे गतीने व्हावीत, शासकीय खर्चात बचत व्हावी आणि पर्यावरणाचा समतोल राखला जावा या उद्देशाने थर्मल पॉवर स्टेशनमधील राख व कोळसा खाणींमधून उत्खनन करताना निघणारी माती आणि मलब्याचा वापर मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेकरीता पाणंद रस्त्यांच्या कामासाठी उपलब्ध करून देण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णयः-**

मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेमधून राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात शेत/पाणंद रस्ते निर्माण होणार असून सार्वजनिक हित व ग्रामीण विकासाची निकड लक्षात घेता, मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेकरीता कोळसा खाणींमधून उत्खनन करताना निघणारी माती आणि

मलब्याचा (Overburden) व लिग्नाइट आधारित ताप विद्युत प्रकल्पांमधून (Thermal Power Plants - TPPs) निघणाऱ्या राखेचा (फ्लाय ॲश आणि बॉटम ॲश) वापर करण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे:-

१. राज्यातील एनटीपीसी (NTPC) आणि इतर सर्व शासकीय/निमशासकीय थर्मल पॉवर स्टेशनमधून निर्माण होणारी राख (Fly Ash/Bottom Ash) "मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना" अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामासाठी संबंधित प्रकल्पांकडून प्राधान्याने उपलब्ध करून घ्यावी.

२. मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेकरीता कोळसा खाणींमधून उत्खनन करताना निघणारी माती आणि मलबा (Overburden) संबंधित कोळसा खाण संस्थांकडून प्राधान्याने उपलब्ध करुन घ्यावा.

३. या योजनेअंतर्गत पाणंद रस्त्यांच्या भरावासाठी वापरण्यात येणारी राख/ कोळसा खाणींमधून उत्खनन करताना निघणारी माती आणि मलबा (Overburden)/ पडलेल्या इमारतींचा मलबा व माती यावर महसूल विभागामार्फत कोणत्याही प्रकारचे स्वामित्वधन (Royalty) किंवा जिल्हा खनिज प्रतिष्ठान (DMF) निधीची आकारणी केली जाणार नाही.

४. मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेकरीता निश्चित केलेल्या कार्यान्वयीन यंत्रणांनी शेत/पाणंद रस्ते तयार करताना वापरण्यात येणा-या कोळसा खाणींमधून उत्खनन करताना निघणारी माती आणि मलब्याचा (Overburden) व लिग्नाइट आधारित ताप विद्युत प्रकल्पांमधून (Thermal Power Plants - TPPs) निघणाऱ्या राखेची (फ्लाय ॲश आणि बॉटम ॲश) तांत्रिक व्यवहार्यता प्रमाणित करून घेणे आवश्यक राहील.

५. रस्त्यांच्या डिझाइन व मानकानुसार राखेचा/मलब्याचा वापर केवळ भरावासाठी व मजबुतीकरणाच्या थरासाठी (Embankment/Sub-grade) करताना आवश्यक ती कार्यप्रणाली संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेने निश्चित करावी.

६. ज्या जिल्ह्यांमध्ये कोळसा खाणी व लिग्नाइट आधारित ताप विद्युत प्रकल्प (Thermal Power Plants - TPPs) आहेत त्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनी संबधित संस्थाशी संपर्क साधून सामंजस्य करार (MoU) करून फ्लाय ॲश व माती/मलब्याचा पुरवठा निश्चित करावा.

७. कोळसा खाणींमधून उत्खनन करताना निघणारी माती आणि मलब्याचा (Overburden) व लिग्नाइट आधारित ताप विद्युत प्रकल्पांमधून (Thermal Power Plants - TPPs) निघणाऱ्या राखेचा (फ्लाय ॲश आणि बॉटम ॲश) वाहतूक खर्च या योजनेच्या मंजूर अंदाजपत्रकात समाविष्ट करावा.

८. राखेची वाहतूक करताना ती उडून पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

९. या सवलतीचा लाभ केवळ अधिकृत मंजूर पाणंद रस्त्यांच्या कामांसाठीच घेता येईल. राखेचा अन्य कोणत्याही व्यावसायिक कारणासाठी गैरवापर होणार नाही, याची जबाबदारी संबंधित यंत्रणेच्या (उदा. ग्रामविकास/सार्वजनिक बांधकाम विभाग) कार्यकारी अभियंत्यांची व महसूल अधिकाऱ्यांची राहील.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२८१३२०५५५७४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATAPSINH MACCHINDRA KHARAT

Digitally signed by PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=0e963b9a3b438beeb9634a49f8df67395a23cc57553bf278360d37dc7d2fbada, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E85A4EBC6765D49CC36FAB03572D08CB3773059876920F924659873AA200A822, cn=PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
Date: 2026.07.28 14:15:52 +05'30'

**(प्रतापसिंह म. खरात)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) महाराष्ट्र शासन यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
८. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१०. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई,
११. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. सर्व विभागीय आयुक्त
१३. सर्व जिल्हाधिकारी.
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरिता)
१६. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.
१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१९. निवडनस्ती (पाणंद रस्ते)